ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ४७

राजेंद्र कोंडे

(इ. १०वी १९७९)

दि. १९ डिसेंबर २०२१

माझ्याकडे एक विशेष क्षमता आहे. मी ताण घेत नाही. मी मागे काय झाले हे आठवत बसत नाही. अशा अनेक गोष्टी असतात की ज्या आपल्याला निराश करून टाकतात. आपण काय केलं? कसं केलं? काय करायला पाहिजे होतं? असे विचार मी करत बसत नाही. जुन्या आठवणी मी उगाळत बसत नाही. भूतकाळाचा जास्त विचार आणि भविष्याची खूप चिंता न करता 'आजचा दिवस आपला' असा विचार करून वर्तमानात जगलो तर आपण चिरतरुण राहू शकतो. आपल्या छंदासाठी वेळ काढला तर आपण कायम उत्साही राहतो. मी अजूनही क्रिकेट, बॅडमिंटन असे खेळ आवर्जून खेळतो.

मी यंत्रणेचा एक भाग असल्याने यंत्रणेच्या त्रुटी लक्षात येतात. विशेषत: सरकारी यंत्रणेमध्ये आज क्रीडा क्षेत्रात कमिटेड व्यक्तींची वानवा आहे. ऑलिंपिकमध्ये, आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके मिळवणे हा मोठा प्रश्न आहे आणि तो वैयक्तिक पातळीवर हाताळला जाऊ शकत नाही. त्यासाठी संपूर्ण यंत्रणेचं साहाय्य लागते. सरकारची धोरणं त्यासाठी अनुकूल असायला लागतात आणि हे सर्व असले तरी योजना राबवणारी माणसे देखील सक्षम असायला लागतात. सरकार बदलून फार फरक पडत नाही कारण ही धोरणे राबवणारी माणसे सारखीच असतात. त्यासाठी अशी झोकून देऊन काम करणारी माणसे अधिकाधिक तयार व्हायला लागतील.

## मंडई विद्यापीठ ते प्रबोधिनी विद्यापीठ

माझे घर शुक्रवार पेठेत मंडई जवळ होते त्यामुळे मी सांगतो, की मी मंडई विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. इयत्ता चौथी पर्यंत सरस्वती मंदिर प्रशालेत होतो. वर्गातील पहिल्या पाच क्रमांकात माझा चौथा क्रमांक आला होता. आम्हाला त्या शाळेतील शिक्षकांनी सुचवले, ज्ञान प्रबोधिनी नावाची एक चांगली संस्था आहे, त्यामध्ये तुम्ही प्रवेश घ्यावा. वडिलांनी आमच्या एका परिचितांना सल्ला विचारला. त्यांनी सांगितले की जरूर त्याला त्या शाळेत घाला. चाचणी परीक्षेत माझी निवड झाली आणि मग मी प्रबोधिनीत आलो. बाकी चार जणांची मात्र निवड झाली नाही. उषाताईंनी आमची चाचणी परीक्षा घेतली होती. तोंडी परीक्षेत त्या दिवशीच्या वृत्तपत्रातील ठळक मथळा विचारला. मला वाचनाची आवड होती. त्या दिवशीची मुख्य बातमी, जी रेल्वे संपा बद्दल होती त्याबद्दल मी सविस्तर बोललो. करंट अफेअर हा शब्द अलीकडच्या काळातला आहे पण त्याची जाणीव मला लहानपणातच झालेली होती.



**मा. वाच. उषाताई खिरे**

येथील शिस्त आणि एकूण सर्व वातावरणच वेगळं होतं. जुन्या शाळेत मधल्या सुट्टीत अगदी आम्ही कधी-कधी घरीही पळून जात होतो, तशी सोय इथे नव्हती. वर्गात अनेक मित्र झाले, प्रसाद सबनीस हा त्यापैकी एक मित्र. दुर्दैवाने ट्रेकिंगच्या अपघातात तो अकाली गेला.

## शिक्षकांच्या आठवणी

प्रशालेतील अनेक शिक्षकांच्या आठवणी दीर्घकाळ स्मरणात राहतील अशा आहेत. वामनराव एकदा आमच्या वर्गावर तास घेण्यासाठी आले असताना वर्गात खूपच गोंधळ सुरू होता. त्यांनी काही जणांना पुढे बोलावले. नंतर प्रत्येकाला त्यांनी नावे विचारली. त्या वेळी पहिल्याने सांगितलं, 'मी रवींद्र', पुढचा म्हणाला 'मी नरेंद्र' त्यानंतर मी होतो, मी म्हणालो, 'मी राजेंद्र'. तिघांची नावे ऐकून घेतल्यावर वामनराव म्हणाले, ''इंद्राचे वेगवेगळे अवतार इथे वर्गात आलेले दिसतात''. त्यांच्या पेन्सिलीच्या शिक्षेची आम्हा सर्वांनाच खूप भीती वाटायची. हाताच्या दोन बोटांमध्ये पेन्सिल ठेवून ते हात घट्ट दाबत असत. अनेक वर्षांच्या खंडानंतर पाच वर्षांपूर्वी मी निगडीला गेलो तेव्हा त्यांना भेटलो. त्यांच्या कार्यालयात पेन, पेन्सिली, बघितल्यावर मला जुन्या शिक्षांची आठवण झाली. त्याची त्यांना आठवण करून दिल्यावर त्यांनाही आश्चर्य वाटले आणि ते मनापासून हसले.

## सोनेरी दिवस : दलातला सहभाग

प्रबोधिनीच्या शिक्षणात पाचवी ते बारावी असा दीर्घकाळ माझा सहभाग होता. प्रशालेपेक्षा दलावरच्या उपक्रमात मी जास्त रंगलो. शरदराव, मोहनराव आमचे मार्गदर्शक व युवक सचिव होते. गोलखोखो, लंगडी, आट्यापाट्या, कबड्डी या सारखे भारतीय खेळ तसेच व्हॉलीबॉल, फुटबॉल, इतकेच काय तर त्या काळात कोणीही न खेळलेले रग्बी आणि बेसबॉल देखील आम्ही खेळलो. अनेक वर्षे आम्ही प्रशालेसाठी अजिंक्यपद मिळवत होतो. उपांत्य फेरीत मॉर्डन व अंतिम फेरीत नूमविला हरवून जिंकायचे हा अलिखित नियम झालेला होता. वर्गात मी सर्वात उंचीने लहान पण गोल खोखोचे असे अनेक सामने मी सूर मारून गाजविले. पहिल्या जोडीत पाच-पाच मिनिटे नाबाद राहून पळायचा माझा अनेक वर्ष हातखंडा होता. जुने अनेक मित्र मला गोल खोखो मुळे आजही ओळखतात.

गोल खोखो मधील माझ्या प्रावीण्यामुळे, त्यावेळचे नव महाराष्ट्र संघास मार्गदर्शन करणारे व एक उत्कृष्ट खेळाडू म्हणून ओळख असणारे श्री. श्रीरंग इनामदार प्रबोधिनीमध्ये आले आणि म्हणाले की या मुलाला आमच्याकडे पाठवा. त्यावेळेस शरदराव युवक सचिव होते. त्यांनी त्यांना नम्र नकार दिला. खेळाच्या बरोबरीने अनेक उपक्रमांत राजेंद्रने भाग घ्यायला हवा आहे, केवळ एक खेळ तो खेळेल असे नाही. श्री. इनामदार यांना नंतर शिवछत्रपती व अर्जुन पुरस्कार मिळाला. पुण्याच्या क्रीडा क्षेत्रात हे एक नावाजलेले व्यक्तिमत्त्व आहे. प्रबोधिनीत माझी कबड्डी संघातही उत्तम कामगिरी होती. त्यावेळी मी मंडई जवळील बदामी हौद संघाकडून ही सामने खेळायचो. नंतर अनेक वर्षे मी युवक विभागातर्फे सरस्वती दलाचे काम बघत होतो. श्रीकांतराव करमरकर आमचे प्रमुख होते. ते सर्व दिवस 'सोनेरी दिवस' होते असे मी म्हणू शकतो.





**हे आनंदी गाणे**

**संस्मरणीय गटकार्य**

प्रबोधिनीतील भरगच्च दिनक्रम सर्वच नातेवाईक व परिचितांना गोंधळून टाकणारा होता. सकाळी आठ-नऊ वाजता सुरू झालेला शाळेचा दिवस रात्री आठ-नऊ पर्यंत नक्की चालायचा. सुरुवातीला न्यू इंग्लिश स्कूल येथील क्रीडांगणवर पाणी मारून, फक्की मारून मैदान तयार व्हायचं. त्यानंतर आम्ही दलावर भरपूर खेळत असू . असेच एक लक्षात राहिलेले गटकार्य म्हणजे, वडारवाडी येथे जाऊन तेथे चालू असलेला दारूचा गुत्ता बंद पाडणे. आम्ही तीन-चार जण होतो. काय करायचे याचे नियोजन केले होते. अगोदर जाऊन जागा पाहून आलो. परतताना पळून कसे व कुठून यायचे ते ही रस्ते बघून ठेवले. ठरल्याप्रमाणे त्या ठिकाणी पोचलो. एक महिला ते दुकान चालवत होती. दुकानात जाऊन आम्ही दारू विरोधी घोषणा दिल्या. सामानाची उलथापालथ केली. आरडाओरड व गोंधळात अनेक जण जमले. आम्ही तेथून काढता पाय घेतला. बाकी सर्वजण ठरलेल्या रस्त्याने प्रबोधिनीत परतले. मी मात्र नेमका रस्ता चुकलो! मी न परतल्याने सगळेच काळजीत होते. शोधाशोध सुरू झाली. बऱ्याच वेळानंतर लांबच्या रस्त्याने मी प्रबोधिनीत आल्यावर सगळ्यांनी सुटकेचा श्वास सोडला. ते सगळेच अनुभव अविस्मरणीय आहेत.

पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या भेटीच्या वेळेस म्हटलेले पद्य 'हे आनंदी गाणे', त्यावेळेस त्यांनी केलेले भाषण- 'देशासमोर इतके प्रश्न आहेत की दरवर्षी प्रबोधिनीने शंभर कार्यकर्ते देशासाठी पुरविले पाहिजेत', वालचंदनगर व भोर येथे घेतलेली विस्तार शिबिरे, कडाक्याच्या थंडीत हिवाळी शिबिर व त्यामध्ये सकस आहार म्हणून खाल्लेली मोड आलेली कडधान्ये, अमावस्येच्या रात्री कात्रज घाटात वाहने मोजणे, अविदाचे इतिहास शिकवणे, युवक विभागातून योजलेल्या व पूर्ण केलेल्या दुर्गभ्रमण सहली हे सर्व उपक्रम व्यक्तिमत्त्व संपन्न करणारे होते. त्याचा ठसा आजही आहे.

साखर गावात पूल बांधलेला होता त्या वेळी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ऊन-वारा-पाऊस कशाचीही पर्वा न करता आण्णा सतत काम करत होते. ते काम चालू असताना मी तिथे गेलो होतो. आण्णांनी खूप चिकाटीने ते काम केले. सुरुवातीला तर गावकऱ्यांचा देखील विरोध होता. Seeing is believing म्हणतात त्याप्रमाणे मी आण्णांचे काम पाहत मोठा झालो. असे अनुभव शालेय शिक्षणाव्यतिरिक्त मुलांना द्यायलाच हवेत असे मला वाटते. या मुळेच प्रबोधिनीतील विद्यार्थी आज त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रात यशस्वी आहेत असे वाटते.



**साखर गावातील पुलासाठी मुक्काम ठोकून राहिलेले आ. आण्णा**

**आंध्र मदत कार्यात सहभाग**

मी मंडईजवळ राहणारा आहे. शनिवारी प्रबोधिनीच्या सुरवार, झब्बा, टोपी अशा गणवेशात ताठ मानेने चालत येणे, हा अनेकांच्या साठी तेथे कुतूहलाचा, चर्चेचा आणि आकर्षणाचा विषय असायचा. मंडई जवळील वातावरण व प्रबोधिनीतील वातावरण हा विरोधाभास असायचा. आंध्र वादळाच्या मदत कार्याच्या वेळेस मी नववीमध्ये होतो. घरच्यांची आंध्रला जायला परवानगी नव्हती. वादळानंतर साथीचे रोग पसरण्याची भीती होती. अचानक एका रात्री आप्पा माझ्या घरी आले. घरचे सर्वजण चकित झाले. त्यांनी आई-वडीलांची समजूत काढली. मदत कार्याला जाण्यापूर्वी मी पुण्यात निधी संकलन केले होते. त्यात सर्वात जास्त निधी, वस्तू, धान्य मी जमा केले होते त्यामुळे मला ही संधी मिळते आहे असे आप्पांनी सांगितले. घरच्यांची समजूत काढताना ते म्हणाले, 'प्रबोधिनीत प्रवेश घेतल्यावर तुम्ही तुमच्या मुलाची जबाबदारी आमच्याकडेही दिली आहे !

त्यामुळे नि:शंकपणे पाठवा. अशा कामातून शिकण्याची ही अशी संधी त्याला पुन्हा मिळणार नाही'. आप्पांची शिस्त कठोर होती पण तेवढीच माया ही सर्वांवर होती. आंध्रला मी अनेक संस्था बघितल्या ज्यांचे काम खरोखरच विश्वासार्ह होते. अशांपर्यंत निधी व वस्तुरूप देणगी पोचेल याची काळजी आम्ही घेतली. जाण्यापूर्वी मी इंजेक्शन घेतले होते त्याचा दोन-तीन दिवस तापही आला पण तरीही मी मदत कार्यात सहभागी होऊ शकलो.

प्रबोधिनीत असताना त्यावेळी आम्ही एका कवचात असल्यासारखे होतो. प्रबोधिनी मधून बाहेर पडल्यावर, मी अशी अनेक मुले पाहिली आहेत जी थोडी बेफाम झाली होती. प्रबोधिनीत असताना समाजातील दुष्ट प्रवृत्तींचे तुमच्यावर काही परिणाम होत नाहीत पण बाहेर पडल्यावर अनेकजण चिंतित होतात. मला सुद्धा काही काळ तसे जाणवले हे काहीतरी वेगळेच जग आहे आणि त्याच्याशी आपण कसं जुळवून घ्यायचं अशी चिंता वाटली. प्रबोधिनीतून बाहेर पडल्यावर इतरांशी जुळवून घ्यायला प्रबोधिनीतल्या मुलांना काही काळ जातो. हे स्थित्यंतर अधिक सोपे होऊ शकते, कदाचित आता ते बदलही झाले असतील.

### शेतीचे शिक्षण



इयत्ता बारावी उत्तीर्ण झाल्यावर मी बीएस्सी ॲग्रीकल्चर हा अभ्यासक्रम निवडला. माझे गाव पुण्याजवळचे खेड-शिवापूर. घरी शेती व्यवसायाची पार्श्वभूमी होतीच. पुण्यात महात्मा फुले मंडई येथे वडिलोपार्जित भाजी विक्रीसाठी गाळा होता. त्यामुळे शेती अभ्यासक्रमाकडे मी आपसूकच वळलो. पहिले वर्ष कोल्हापूरला पूर्ण केले. दुसरे व तिसरे वर्ष पुण्यात कृषी महाविद्यालयात झाले. बीएस्सी पदवी पूर्ण झाल्यावर एमएस्सी कृषी अभ्यासक्रमाला राहुरी विद्यापीठात प्रवेश घेतला. तीन वर्षांच्या या पदव्युत्तर अभ्यासाकरिता इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चर रिसर्च, दिल्ली, येथील कृषी क्षेत्रातील सर्वोच्च संस्थेतर्फे शिष्यवृत्तीसाठी माझी निवड झाली. दहा जणांना ही शिष्यवृत्ती मिळते. मी त्यात होतो ही माझ्यासाठी अभिमानाची बाब होती. एमएस्सी पूर्ण करताना एकीकडे अमेरिकेत जाऊन याच क्षेत्रात पीएच्डी करण्याची माझी तयारी पूर्ण होत होती. टोफेल, जीआरई परीक्षांमध्येही उत्तम गुण होते. मी अशी तयारी करतोय याची घरच्यांना फार माहितीही नव्हती. पण नंतर मी परदेशात गेलो की पुन्हा परत येणार नाही, पीएच्.डी करून करणार काय, घरचा व्यवसाय शेती असताना आणखी शिक्षण कशाला हवे- असे सगळ्याच वडिलधाऱ्या मंडळींचे मत होते. त्यावेळेस घरच्यांचे (ज्येष्ठांचे) निर्णय लहानांनी ऐकायचे अशी पद्धत होती! त्यामुळे माझे पीएच्डी चे स्वप्न व परदेशगमनाची संधी मागे पडली. एसएस्सी पूर्ण झाल्यावर मी पुण्याजवळच थेऊर सहकारी साखर कारखान्यात कृषि विस्तार अधिकारी म्हणून नोकरी केली. तीन वर्षे महाविद्यालयात शिकविण्याचेही काम केले. वडिलांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे मला ते काम सोडून देऊन घरच्याच व्यवसायात त्यानंतर पूर्ण लक्ष द्यावे लागले. त्या काळातच मी एमपीएससी चीही परीक्षा उत्तीर्ण झालो होतो. पण त्यात मला हवे ते पद व विभाग मिळणार नव्हता. वनखात्यात Assistant Conservator of Forest (ACF) हे पद होते. जंगलात कामाची जागा होती. कोईमतूरला प्रशिक्षण होणार होते. पण मला लोकसंपर्क, लोकांमध्ये राहणे आवडायचे त्यामुळे ती नोकरी मी स्वीकारली नाही.

### राहुरीतल्या आठवणी

राहुरीत शिकत असताना अनेक वक्तृत्वस्पर्धा गाजवल्या. विद्यापीठातर्फे एका स्पर्धेसाठी कलकत्त्याला गेलो होतो. भाषणाचा विषय होता 'स्वामी विवेकानंद अँड हिज न्यू वेदांता फिलोसॉफी'. प्रबोधिनीमुळे या सगळ्या विषयाचा अभ्यास आणि पार्श्वभूमी तयार होती. वाचन व पूर्ण तयारी करून मी भाषण केले. बेलूर मठात मला तीन चार दिवस राहण्याची संधी त्यामुळे मिळाली. भारतातील निवडक अशा विद्यार्थ्यांमध्ये माझी निवड झाली होती. भारतभरातील विद्यापीठातील मुलांसमोर रामकृष्ण मठामध्ये विवेकानंदांच्या विचारांवर बोलणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता.

### बुद्धिबळ : Chess is a way of Life!!



महाविद्यालयात गेल्यावर मी माझे खेळ बदलले. खेड्यातून आलेल्या ताकदवान मुलांसमोर कबड्डी सारख्या खेळात माझी काही डाळ शिजणार नाही हे कळून चुकले आणि मग मी बुद्धिबळ व टेबल टेनिस या दोन खेळात शिरलो. महाविद्यालयात असताना आंतर महाविद्यालयीन व आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये बुद्धिबळासाठी मी माझ्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. २००४ मध्ये एक वेगळी संधी मला मिळाली. बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या भारतीय संघाचा असिस्टंट मॅनेजर









म्हणून मी स्पेनला भारतीय संघासोबत २१ दिवस गेलो होतो. दर दोन वर्षांनी हे बुद्धिबळाचे ऑलिम्पियाड होते. भारताचे पुरुष गटाचे नेतृत्व विश्वनाथन आनंद व महिला गटाचे नेतृत्व कोनेरू हंपी करत होत्या. हा एक वेगळाच अनुभव मला मिळाला.

काही काळ मनोज देवळेकर बरोबर मी निगडीमध्ये तेथील शाळेतील मुलांच्या बुद्धिबळ प्रशिक्षणासाठी काम केले. ती मुले पुढे आंतरशालेय स्पर्धेमध्ये उतरली आणि त्यांनी चांगली कामगिरी करत विजय मिळवले.

बुद्धिबळ खेळण्याचे अनेक फायदे आहेत– एकाग्रता वाढणे, जिद्द वाढणे, पेशन्स वाढणे. असे अनेक फायदे असल्याने पालकांना देखील वाटते की आपल्या मुलांनी बुद्धिबळ खेळले पाहिजे. अनेक राजकारण्यांना देखील वाटते की आपण बुद्धिबळ खेळले पाहिजे. जेणेकरून पटाबाहेर आपण चाली करू शकू !! शहरी भागामध्ये अनेक सोयी–सुविधा उपलब्ध आहेत. मात्र ग्रामीण भागामध्ये आज तितक्याशा सोयी उपलब्ध नाहीत. आम्ही मुख्यतः ग्रामीण भागामधील गाव, तालुका, जिल्हा पातळीवर अशा संधी आणि सोयी उपलब्ध होतील यासाठी काम करतो.

पुण्या–मुंबईसारख्या शहरांमध्ये खाजगी क्लासेसला आणि स्पर्धांना देखील गर्दी असते. आता ग्रामीण भागातून देखील अनेक गुणवंत खेळाडू पुढे येत आहेत आणि त्यांच्या प्रशिक्षणाची सोय देखील आम्ही करत आहोत. एकूणातच खेळाची प्रसिद्धी वाढल्याने अनेक लोक त्याकडे आकर्षित होत आहेत आणि खेळ खेळण्यास प्रवृत्त होत आहेत. गेली पंधरा वर्षे मी पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेचा कार्यवाह आहे. महाराष्ट्र राज्य संघटनेचा खजिनदार आहे. बुद्धिबळाचा प्रचार, प्रसार सर्वदूर व्हावा यासाठी आमची संघटना काम करते. यासाठी नंदुरबार पासून नागपूर पर्यंत सर्व ठिकाणी जाणे, त्या–त्या ठिकाणी स्पर्धांचे आयोजन करणे अशी अनेक कामे आम्ही करतो आहोत. अशा उपक्रमांच्या स्पर्धा घ्यायला देखील अनेक गोष्टी जुळवायला लागतात. त्यामध्ये जागा, आर्थिक पाठबळ, कार्यकर्ते, साहित्य अशा सर्व गोष्टींचा समावेश असतो.





**इंडियन ग्रँड मास्टर प्रग्यानंद, चॅम्पियन ऑफ द टूर्नामेंट**






महाराष्ट्र स्पोर्ट्स

# एकाच दिवसात १८४ बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन

पाच हजार ९१९ खेळाडूंचा सहभाग, भारतीय बुद्धिबळ इतिहासात विक्रम

| विक्रमी स्पर्धांचे आयोजन | एकूण स्पर्धा | सहभागी खेळाडू | सहभागी देश |
|---|---|---|---|
| | १८४ | ५ हजार ९१९ | १७ |


INDIAN BOOK of RECORDS

Indian World Record

THIS CERTIFICATE IS PROUDLY PRESENTED TO

Mr. Rajendraji Konde

On this Twenty Fourth Day of July, 2021

Special Recognition and Commendations are conveyed to Mr.Rajendraji Konde, who has an unwavering commitment towards the Chess, determined with a vision, achieved with passion by thinking out of the box, mastered his will to prove nothing is impossible by Sponsoring World's Largest Chess Tournament organizing 184 Chess Tournaments in 24 Hours with 5919 participants with lichess.org platform organized by PR Chess World on the eve of 57th Pre-Birthday Celebration of Honourable Mr. Rajendraji Konde on 21st July 2021 to inspire, motivate and encourage. Mr.Rajendraji Konde, achieved a new "Indian World Record", and adjudicated by Dr. GVNRSSS Vara Prasad, Advocate, Supreme Court of India, at Hyderabad, Telangana, India.

Dr. Vivekananda Babu K
Founder Editor
INDIAN BOOK OF RECORDS
THE KEEPER OF THE INDIAN RECORDS

२२ जुलै हा माझा वाढदिवस. बुद्धिबळ संघटनेमुळे अनेक मित्र कार्यकर्ते जोडले गेले आहेत. त्यांनी ठरवले, की माझ्या वाढदिवसानिमित्त २०२१ साली सलग चोवीस तास बुद्धिबळ स्पर्धा भरवायची. रात्री बारा ते दुसऱ्या दिवशी रात्री बारा असे नियोजन ठरले. स्पर्धेत अनेक प्रकार होते. क्लासिकल, जलद, रॅपिड, बुलेट इत्यादी. आम्ही एकत्रित नियोजन केले व कार्यवाही केली. पुण्यात व इतर अनेक ठिकाणी मिळून १८४ स्पर्धा झाल्या. स्पर्धा प्रमाणित होती त्यामुळे सहभागी सर्वांना प्रशस्तीपत्रक देखील दिली गेली. हा एक जागतिक विक्रम ठरला. इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्याची नोंद झाली.

### पुणे स्टॉक एक्स्चेंज

पुण्यात बऱ्याच वर्षांपूर्वी पुणे स्टॉक एक्सचेंज होते. त्याचा मी संचालक होतो. त्या जबाबदारीत इन्व्हेस्टर एज्युकेशन प्रोग्राम आम्ही हाती घेतला. क्लब ऑफ महाराष्ट्र याचाही मी संचालक आहे. गणेश कला क्रीडा मंडळ व नेहरू स्टेडियम या क्लबच्या मालकीचे आहेत. बुद्धिबळ संघटनेच्या कामात गेले पंधरा-वीस वर्षे तरी मी आहे. सर्वच ठिकाणी अनेकांना बरोबर घेऊन पुढे जावे लागते मी त्याला Team बँक म्हणतो. प्रत्येकच कामात नवीन प्रयोग करण्याची संधी मी शोधत गेलो.

### शेती व त्यापुढील आव्हाने

एमएस्सीला असताना ॲग्रिकल्चर एक्सटेन्शन, विस्तार, प्रचार हाच माझा विषय होत. कृषी क्षेत्रात झालेले संशोधन मोठ्या प्रमाणात प्रयोगशाळेतच राहते, शेतकऱ्यांपर्यंत पोचत नाही. कृषी साहाय्यक एकीकडे गाव पातळीवर थेट संपर्कात असतात. त्यांची यात महत्त्वाची भूमिका असते. माझ्या गावात व आजूबाजूच्या गावांत त्यांच्याबरोबर एकत्र काही काम करण्याचा प्रयत्न देखील मी केला.

माझ्या शेतात रेशीम उत्पादन व आळंबी लागवडीचा प्रयोग केला. गांडूळ शेती करून पाहिली. स्वयंरोजगार वाढावा यासाठी प्रयत्न केले. तंटामुक्त गाव व्हावे यासाठी गावात सामाजिक उपक्रमांत अनेकांना जोडण्याचे काम केले. अशी वेगवेगळी कामे मी करतो आहे. जे काम हातात घेऊ त्यात झोकून देऊन उतरायचे ही शिकवण मनात ठेवली. Once a member of Prabodhini is always a member of Prabodhini हे कायम मनात असते. शेतीमध्ये उत्पादनापासून विक्री पर्यंतची सर्व कामे मी केलेली आहेत. आता फार्महाऊस आहे. माझ्याकडे डेअरी होती, म्हशी होत्या, कोंबड्या, शेळी, गाई, ससे पालन असे मी सगळे आवडीने केले. रेशीम उद्योग केला. दरवेळी पैसा हा भाग नव्हता. सर्वात यश मिळाले. फक्त काही ठिकाणी कमी कष्टात जास्त यश तर काही ठिकाणी जास्त कष्टात कमी यश!! जेव्हा वाटले त्यावेळी मी त्या-त्या गोष्टी बंद देखील केल्या. मार्केटयार्ड मध्ये आमचा विक्रीचा गाळा आहेच.


सकाळ अॅग्रोवन

बाजारपेठेच्या अभ्यासातून शेती बनवली व्यावसायिक

गेली ७-८ वर्षे मी exotic fruits आणि भाजीपाला याचा पुण्यातील पंचतारांकित हॉटेल्स आणि दवाखान्यांना दररोज पुरवठा करत होतो. त्यामध्ये आपल्या ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा देखील समावेश होता. टाळेबंदीच्या काळात आर्थिक गणिते आणि इतर आघाड्यांवर कसरत व्हायला लागल्यावर मी हा पुरवठा व्यवसाय बंद केला.

इथून पुढच्या काळात लोकसंख्या वाढत असल्याने शेतीला महत्त्व येणार आहे. मुळात जमीन तितक्याच प्रमाणात उपलब्ध असल्याने, कमीत-कमी जागेत, जास्तीत-जास्त उत्पन्न काढणारे तंत्रज्ञान अवगत व्हायला लागेल. केवळ पारंपरिक पद्धतीने शेती न करता त्यात योग्य ते शिक्षण घेऊन आणि तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत प्रगती साधायला हवी. मी जेव्हा शेती करायला सुरुवात केली त्यावेळेस होते त्यापैकी अर्धे लोक देखील सध्या शेती करत नाही. शेती कमी होत चालली आहे याची कारणे अगदी तापमान वाढीपासून ते सरकारचे धोरण, माणसाची कष्ट करायची कमी होत चाललेली वृत्ती आणि झटपट पैसा मिळवण्याची प्रवृत्ती अशी अनेक आहेत.

**राजकारण आणि नेतृत्व**

प्रबोधिनीमध्ये आपण 'रूप पालटू देशाचे' व 'नेतृत्वाचे प्रशिक्षण' असे म्हणत असतो. माझ्या वाटचालीत या संस्कारांचा धागा खूप घट्ट आहे. किंबहुना आज मी जे काही करू शकलो, ज्या ठिकाणी आहे त्यासाठी प्रबोधिनीचे संस्कार अत्यंत महत्त्वाचे ठरलेले आहेत. आमच्या घरात राजकारणाची पार्श्वभूमी आहे. माझे काका जिल्हा परिषदेचे सभापती होते. कृषी उत्पन्न बाजार समिती अध्यक्ष अशा अनेक ठिकाणी ते सक्रिय होते. त्यांच्या वेळेस राजकारण वेगळे होते. आता राजकारणात येण्यासाठी 'वेगळी गुणवत्ता' लागते! तशी नसेल तर तुम्ही त्याच्यात टिकत नाही. मला हे लक्षात आले की माझ्याकडे त्यासाठी लागणारी वृत्ती नाही. त्यामुळे अन्य सामाजिक क्षेत्रात मी जास्त पुढाकार घेतला.

अनेक वर्षांपूर्वी अविनाश धर्माधिकारी निवडणुकीस उभा होता त्यावेळेस 'सुजनांचे सशक्तिकरण' असे तो म्हणायचा हे आठवते. त्याच्या प्रचारात मीही सक्रिय होतो. बैठकाही व्हायच्या पण त्या प्रयत्नांना यश आले नाही. त्यानंतर चाणक्यच्या माध्यमातून कार्यकर्ते अधिकारी घडवण्याचा त्याचा प्रयत्न चालू आहे. प्रबोधिनीतही मनोज देवळेकर, महेंद्र सेठीया, विवेक कुलकर्णी यांचे खूप मौल्यवान काम आहे. त्यांच्या इतके योगदान मी देऊ शकलो का नाही माहित नाही पण सक्रिय राजकारणात न येताही अन्य माध्यमांतून मी सक्रिय आहे.

मी खेड-शिवापूरचा असल्याने शिवगंगा खोऱ्यात ग्रामीण विकासाचे काम पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून करावे अशी आप्पांची अपेक्षा होती. महाविद्यालयीन शिक्षणानंतर तसा वेळ मी देऊ शकलो नाही याची खंत आहे. पण माझ्या व्यवसायाच्या व अन्य सामाजिक कामातून माझी धडपड चालूच आहे. कारण प्रबोधिनीत स्वस्थ बसण्याचे, आळसात राहण्याचे, शिक्षणाचे बाळकडू नाही. शिवभूमी शिक्षण संस्थेचा मी संचालक देखील आहे. शिवापूर, यमुना नगर येथे आमच्या चार शाळा आहेत.




**प्रवाहाविरुद्ध पोहता येणे**

प्रबोधिनीची शिकवण म्हणजे, ज्या कोणत्या क्षेत्रात जाऊ तेथे उत्तमता पाहिजे, टॉपला पोचले पाहिजे, कोठेही मूल्यांशी तडजोड नाही. प्रवाहाविरुद्ध पोहता आले पाहिजे. त्याची जिद्द व ताकद हवी. कोणतेही काम केल्यानंतर अभिमानाने त्या कामाबद्दल स्वतः सांगू शकलो पाहिजे. चुकीचे काही काम केले व त्यामुळे मन खात राहिले असे होता कामा नये. मी मंडईत वाढलेला माणूस असूनही निर्व्यसनी आहे, याचे अनेकांना आश्चर्य वाटते. स्पेनमध्ये कडाक्याच्या थंडीत 'काय घेणार काय पिणार' अशी अनेकदा विचारणा व्हायची. तुम्ही या थंडीत त्याला स्पर्श केला नाही तर तुमचा मृत्यू निश्चित असे हे सांगणे मला झाले. पण मी माझी मूल्ये सांभाळून, थंडीतही टिकून राहिलो. अशा अनेक प्रसंगात प्रबोधिनीतील शिक्षणाची शिदोरी उपयोगी पडते.

प्रबोधिनीला कधीच फक्त पाठ्यपुस्तकी शिक्षण घेऊन उत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी घडवायचे नव्हते. अनुभव शिक्षणातून नेतृत्व गुण आणि सर्वांगीण विकास झालेले असे विद्यार्थी घडवायचे होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी १०वीच्या गुणवत्ता यादीत क्रमांक मिळवलेच पाहिजेत असा आग्रह आमच्या बाबतीत कधी नव्हता. सर्वांगीण प्रगती हाच इथल्या शिक्षणाचा पाया होता असे मला वाटते.

**TODAY is THE DAY!**

माझ्याकडे एक विशेष क्षमता आहे. मी ताण घेत नाही. मी मागे काय झाले हे आठवत बसत नाही. अशा अनेक गोष्टी असतात की ज्या आपल्याला निराश करून टाकतात. आपण काय केलं? कसं केलं? काय करायला पाहिजे होतं? असे विचार मी करत बसत नाही. जुन्या आठवणी मी उगाळत बसत नाही. भूतकाळाचा जास्त विचार आणि भविष्याची खूप चिंता न करता आजचा दिवस आपला असा विचार करून वर्तमानात जगलो तर आपण चिरतरुण राहू शकतो. आपल्या छंदासाठी वेळ काढला तर आपण कायम उत्साही राहतो. मी अजूनही क्रिकेट, बॅडमिंटन असे खेळ आवर्जून खेळतो.

मी यंत्रणेचा एक भाग असल्याने यंत्रणेच्या त्रुटी लक्षात येतात. विशेषत: सरकारी यंत्रणेमध्ये आज क्रीडा क्षेत्रात कमिटेड व्यक्तींची वानवा आहे. ऑलिंपिकमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके मिळवणे हा मोठा प्रश्न आहे आणि तो वैयक्तिक पातळीवर हाताळला जाऊ शकत नाही. त्यासाठी संपूर्ण यंत्रणेचं साहाय्य लागते. सरकारची धोरणं त्यासाठी अनुकूल असायला लागतात आणि हे सर्व असले तरी योजना राबवणारी माणसे देखील सक्षम असायला लागतात. सरकार बदलून फार फरक पडत नाही कारण ही धोरणे राबवणारी माणसं सारखीच असतात त्यासाठी अशी झोकून देऊन काम करणारी माणसे अधिकाधिक तयार व्हायला लागतील.


**सामाजिक जाणीव संवर्धन**

प्रबोधिनीमध्ये तुमच्या सामाजिक जाणीवा बोथट होत नाहीत. देशकार्याचे संस्कार तुमच्यावर होतात. कुठल्याही कामामध्ये वैयक्तिक स्वार्थ आणला जात नाही. तुम्ही एका संघटनेचे सदस्य होता. तुम्ही एक टीम मेंबर म्हणून तयार होता. प्रबोधिनीमध्ये आम्ही गुरुपौर्णिमेच्या दिवशी चहाचा स्टॉल लावायचो आणि त्यात जमा झालेले पैसे गुरुदक्षिणा म्हणून द्यायचो. प्रबोधिनीमध्ये असल्यामुळे 'कुठलेही काम छोटे नाही' हा संस्कार आमच्यावर झाला. मी कुणाशीही संवाद साधू शकतो, कुठल्याही प्रकारचे काम करू शकतो आणि त्यात मला कमीपणा वाटत नाही. आम्ही स्वतः खेळायचे मैदान साफ करायचो, शौचालय साफ करायचो आणि त्याची आम्हाला कुठल्या प्रकारे लाज वाटायची नाही.



समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात प्रबोधिनीच्या संस्कारातून तयार झालेल्या मुला-मुलींनी उतरले पाहिजे. समाजासाठी देशासाठी काहीतरी करायला हवे. सामाजिक जाणीव बोथट होऊ न देता समाजासाठी काम करायला हवे. मला हे सर्व प्रबोधिनीतून शिकायला मिळाले. माझ्या पत्नीचा मी करत असलेल्या गोष्टींना विरोध नसतो. हाच मी पाठिंबा समजतो. 'घरातून मोलाची साथ' वगैरे छापील मांडणी मी करणार नाही!! कामानिमित्त अनेक प्रकारे मी व्यस्त असतो, त्याची घरातून तक्रार येत नाही हे महत्त्वाचे! माझ्या मुलानेही प्रशालेत यावे असे वाटत होते, पण त्याला प्रवेश मिळाला नाही. सध्या तो कायद्याची पदवी घेत आहे. तो तीनदा राष्ट्रीय स्तरावर बुद्धिबळ विजेता आहे.

जेपीपी ७९ असा आमचा व्हॉटस् ॲप ग्रुप आहे. आम्ही वर्गमित्र आजही भेटतो. वेगवेगळ्या निमित्ताने प्रबोधिनीच्या कामात हातभार लावायचा प्रयत्न करतो. विविध उपक्रमांत सहभागी होतो. माजी विद्यार्थ्यांनी पूर्ण कराव्यात अशा अपेक्षा असतील त्या आम्ही अपेक्षा म्हणून नव्हे तर जबाबदारी आणि कर्तव्य म्हणून पार पाडण्याचा प्रयत्न करतो. आजही मी गिरीशरावांपासून सर्वांच्या संपर्कात आहे.




## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- मदर इंडिया

२. आवडते पुस्तक - ययाती

३. आवडता छंद - लहान मुलांसोबत लहान होऊन, वय विसरून खेळणे आणि वाचन

४. आवडते ठिकाण - जिथे जातो तिथे आवडीने वावरतो. एक सांगायचे असेल तर सज्जनगडावरचा मुक्काम आवडतो.

५. पहिली प्रतिक्रिया

- बुद्धिबळ - Way of life
- शेती - Future of life
- समाजकार्य - जीवनाचा अविभाज्य भाग
- आप्पा पेंडसे - ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व
- ज्ञान प्रबोधिनी- संस्था, कुटुंब , सर्वकाही. ज्ञान प्रबोधिनी नसती तर मी काहीच नसतो.

६. पुन्हा एकदा जर आयुष्य नव्याने जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल?
- मानसशास्त्र आणि समाजशास्त्रात काम करायला खूप आवडेल.

**राजेंद्र कोंडे**
**9823303540**
**konderajendrap@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org